
महाराष्ट्र पोलीस
वागळे इस्टेट पोलीस ठाणे.
ठाणे शहर
KINGFISHER
KINGFISHER
KINGFISHER
LONDON PILSNER
TUBORG
HAYWARDS 2000

—: प्रेसनोट :—

आज दि. ०५/०३/२१ रोजी रात्रौ ००.१५ वा. फिर्यादी रिक्षा चालक श्री रफिक कासम शेख, रा. कोपरी, ठाणे पु. हे त्यांची रिक्षामध्ये गॅस भरण्याकरीता जात असतांना ३ अनोळखी इसमांनी फिर्यादीची रिक्षा एस.बी. फिरके विदयालय, मेंटल हॉस्पीटल रोड, येथे थांबवुन बंजारावस्ती येथे रिक्षा घेवून जाण्यास सांगीतले. फिर्यादीने सदर ठिकाणी त्यांना सोडले असता, त्यांनी पैसे नाहीत असा बहाणा करून फिर्यादीस आर डी मेन्स वेअर दुकानासमोर पैसे घेण्यास बोलाविले व फिर्यादीस फेवर ब्लॉक उचलून त्याचा धाक दाखवून नमुद ३ इसमांनी फिर्यादीची २ तोळे वजनाची सोन्याची चैन, मोबाईल व रोख रूपये १७००/— असा एकुण ९१७००/— रूपयाचा माल जबरी चोरी करून नेला. सदरबाबत वागळे इस्टेट पो.स्टे गु.र.नं. ७६/२१, भादवि क. ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हयाची माहीती प्राप्त होताच वागळे ईस्टेट पोलीस ठाण्याचे खाली नमुद अधिकारी/कर्मचारी यांनी सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदारांच्या सहाय्याने यातील आरोपीत १) प्रकाश उर्फ बादशाह रमेश शिंदे, वय २५, रा. बंजारा वस्ती, ठाणे प. २) सुरेश उर्फ विकी संतोष पवार, वय २४, रा. सदर यांना ताब्यात घेतले व कसुन चौकशी केली असता, त्यांनी गुन्हा कबुल केल्याने त्यांना अटक करण्यात आले व त्यांचेकडून गुन्हयात जबरी चोरी करून नेलेला माला पैकी २ तोळे वजनाची सोन्यांची चैन व ओप्पो कंपनीचा मोबाईल असा एकुण ९०,०००/— रू. चा माल काढुन दिला. यातील पाहीजे आरोपी सागर माळवी याचा कसुन शोध घेवून त्यास गुन्हयात अटक करण्याची तजवीज ठेवली आहे.

—— " ——

तसेच आज दि. ०५/०३/२१ रोजी रात्रौ ०३.३० वा. मिळालेल्या गोपणीय माहीतीच्या आधारे सईद नासिर शेख, वय ३२ वर्षे, रा. आंबेवाडी, वा.ई. ठाणे प. याचे जनरल स्टोअर्स दुकानात ४२९ देशी दारूच्या क्वार्टर्स, ११८ इंग्लीश दारूच्या क्वार्टर्स, ३३ बियर बॉटल्स असा एकुण २८,४८४/— रू.चा प्रोहिबीशन गुन्हयाचा मुदद्येमाल विनापरवाना आपले कब्जात बाळगला. म्हणुन वागळे ईस्टेट पोस्टे गु.र.नं. ७५/२१, महाराष्ट्र दारूबंदी कायदा क. ६५ ई अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीत सईद नासिर शेख यांस अटक करण्यात आली.

वर नमुद कारवाई मा. अप्पर पोलीस आयुक्त सो., पश्चिम प्रादेशिक विभाग, मा. पोलीस उप आयुक्त, परि ५, मा. सहा. पोलीस आयुक्त, वागळे इस्टेट विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि दत्ता ढोले, पो.नि. विजय मुतडक, सपोनि वळवी, पोउपनि निकुंभ, पोउपनि म्हेत्रे, पो.ह.मोरे, पोना नितीन बांगर, अरूण बांगर, खेडकर, महाले, पोशि सुर्यवंशी, दाभाडे यांनी पार पाडली.

—— " ——

Scanned by CamScanner